# प्रश्नपत्रिकेचे स्वरुप

परीक्षेचा कालावधी, विषय, गुण व प्रश्नपत्रिकेचे स्वरुप याविषयी आपणास. खालील तक्त्यावरुन कल्पना येईल.(As per MHT-CET 2011)

| Particulars | Papers | Sub | Part I 10.00 to 11.30 | Part II 12.00 to 1.30 | Part III 3.00 to 4.30 |
|---|---|---|---|---|---|
| MHT-CET-2011 | 3 | 4 | Phy + Chem | Biology | Maths |
| Health Sciences (BB) | 2 | 3 | Applicable | Applicable | NA |
| Engineering (MM) | 2 | 3 | Applicable | NA | Applicable |
| Both (MB) | 3 | 4 | Applicable | Applicable | Applicable |
| Total Questions | | | 50+50 | 100 | 50 |
| Total Marks | | | 50+50 | 100 | 100 |
| Marks per question | | | 1 each | 1 each | 2 each |
| Question Number | | | 1 to 50 Phy 51 to 100 chem | 101 to 200 | 201 to 250 |
| Answer Sheet Distribution | | | 9.40 am | 11.40 am | 02.40 pm |
| Question Paper Distribution | | | 9.50 am | 11.50 am | 02.50 pm |

## ✦ प्रश्नपत्रिकेचे स्वरुप

1. प्रश्नपत्रिका बहुपर्यायी स्वरुपाची असेल. चारपैकी एकच पर्याय हा योग्य पर्याय असेल.
2. शासनाच्या मान्यता प्राप्त पाठ्यपुस्तकातूनच या प्रश्नांची निवड केली जाते. अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न नसतात. तसे आढळल्यास त्याचे बोनस मार्कस् दिले जातात.
3. प्रश्नप्रत्रिकेचे 4 versions असतात 11, 22, 33 आणि 44. सर्व version ची प्रश्नपत्रिका सारखीच असते. मात्र versions नुसार प्रश्नांच्या क्रमांची अदलाबदल झालेली असते.
   कोणत्याही विद्यार्थ्यांच्या पुढे, मागे व बाजूच्या परीक्षार्थीच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचा क्रम सारखा नसतो. त्यामुळे कोणीही कॉपी करण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा फायदा होत नाही.
4. None of these, All of these असे पर्याय नसतात.
5. 4 पर्याय हे केवळ अभ्यासक्रमातील असले तरी ते समांतर असतात. त्यामुळे अचूक उत्तर शोधताना बुध्दिमत्तेचा कस लागतो.
6. प्रश्नांच्या मसुद्या (stem) मध्ये not चा उल्लेख असेल तर ते अधोरेखित केलेले असते.
7. साधारणात: 30% प्रश्न सामान्य 40% मध्यम पातळी व 30% कठीण पातळीचे असतात.

## ✦ विशेष काळजी घेण्याजोग्या बाबी

1. Physics (50), Chemistry(50), Bio(100) व Maths(50) असे प्रश्न असतील. केवळ Maths च्या प्रत्येक प्रश्नासाठी 2 गुण असतात. त्यामुळे ते सोडवताना अतिशय काळजी घेतली गेली पाहिजे कारण चुकलं की थेट 2 गुणांचे नुकसान होते.
2. सर्व प्रश्न अनिवार्य (Compulsory) असतात. त्यामुळे कोणताही प्रश्न अनुत्तरीत राहणार नाही याची काळजी घ्यावी.
3. प्रत्येक प्रश्नाला साधारणपणे 54 सेकंद वेळ मिळतो, गणितासाठी तो 108 सेकंद असतो. साधारणत: Physics + Chemistry ची प्रश्नपत्रिका सोडविताना तुलनेने फिजिक्सला जादा वेळ लागतो. 90 मिनिटातून 45 मिनिटे प्रत्येक विषयाच्या वाटयाला येतात. जर केमेस्ट्रीचा पार्ट 35 ते 40 मिनिटात सोडविण्यात आला तर 5 ते 10 मिनिटे वेळ फिजिक्स साठी जादा वापरता येऊ शकतो.